# महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे-११

## नियामक मंडळाची ६५ वी बैठक दिनांक ७ जुलै २०१०

**ठराव**

मा. ना. रामराजे नाईक-निंबाळकर, मंत्री, जलसंपदा (कृष्णा खोरे पाटबंधारे महामंडळ) व अध्यक्ष, महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ यांच्या अध्यक्षतेखाली नियामक मंडळाची ६५ वी बैठक दि. ७ जुलै २०१० रोजी मंत्रालय, मुंबई येथे संपन्न झाली.

सदर बैठकीस खालीलप्रमाणे सन्माननीय सदस्य, विशेष निमंत्रित, सदस्यांचे प्रतिनिधी व निमंत्रित उपस्थित होते.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मा. ना. रामराजे नाईक निंबाळकर | ... | मंत्री, जलसंपदा (कृखोपाम) व अध्यक्ष |
| २. | मा. ना. विजय वडेट्टीवार | ... | राज्यमंत्री, जलसंपदा व उपाध्यक्ष |
| ३. | मा. श्री. वल्लभ बेनके | ... | विसस व उपाध्यक्ष |
| ४. | मा. इं. एकनाथ बा. पाटील | ... | सचिव (जसं) व सदस्य |
| ५. | मा. इं. मु. सं. मुंढे | ... | सचिव (लाक्षेवि) व सदस्य |
| ६. | इं. प्रफुल्लचंद्र झपके | ... | कार्यकारी संचालक व सदस्य सचिव |

**नियामक मंडळाच्या सदस्यांचे प्रतिनिधी**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. मधुकर स. कांबळे, अवर सचिव | ... | प्रधान सचिव (वित्त) व सदस्य यांचे प्रतिनिधी |

**निमंत्रित अधिकारी**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | इं. शि. मा. उपासे | ... | मुख्य अभियंता (जसं), पुणे |
| २. | इं. चं. आ. बिराजदार | ... | मुख्य अभियंता (विप्र), पुणे |
| ३. | श्री. अ.स. शिरुडे | ... | मुख्य लेखा व वित्त अधिकारी (मकृखोविम) |
| ४. | इं. भा. चं. कुंजीर | ... | अ.अ. व प्रशासक, लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, पुणे |
| ५. | इं. अ. वा. सुर्वे | .... | अ.अ., पुणे पाटबंधारे मंडळ, पुणे |

बैठकीच्या सुरुवातीस कार्यकारी संचालक व सदस्य सचिवांनी मा. अध्यक्ष, मा. उपाध्यक्ष, सन्माननीय सदस्य व उपस्थितांचे स्वागत केले. तद्नंतर बैठकीत विषयवार चर्चा होऊन खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यांत आले.

**"मान्य"**

**सही/-**
**(इंजि. प्रफुल्लचंद्र चं. झपके)**
**कार्यकारी संचालक**
**म.कृ.खो.वि.म, पुणे**

**सही/-**
**(मा. ना. श्री. रामराजे नाईक-निंबाळकर)**
**मा.मंत्री, जलसंपदा (कृ.खो.पा.म.)**
**व अध्यक्ष, म.कृ.खो.वि.म. पुणे**

# महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे-११

## नियामक मंडळाची ६५ वी बैठक दिनांक ७ जुलै २०१०

ठराव क्र. ६५/१

“नियामक मंडळाच्या ६३ व्या बैठकीत पारीत केलेल्या ठरावांवर करण्यात आलेल्या कार्यवाहीचा अहवाल नियामक मंडळाच्या अवलोकनार्थ सादर केला असल्याने या विषयाबाबत कोणताही ठराव पारीत करण्यात आला नाही.”

ठराव क्र. ६५/२

“ठराव करण्यात येतो की, नियामक मंडळाच्या ६४ व्या बैठकीत पारित करण्यात आलेले ठराव कायम करण्यात येत आहेत.”

ठराव क्र. ६५/३

“बारामती येथील पाटबंधारे खात्याची नीरा डावा कालवा कि.मी.७८ मधील सा.क्र. ७७/३४० ते ७७/४६५ मधील सेवापथ बाजूची बारामती नगरपालिका हद्दीतील गट क्र.२६६ मधील ६२५ चौ.मी. जागा भविष्यात खात्यास लागणार नसल्याने शासकीय दराने होणारी किंमत रु. ९.०० लक्ष महामंडळास मिळण्याच्या अटीवर सिल्व्हर ज्युबिली शासकीय ग्रामीण रुग्णालय, बारामती यांना देण्यासाठी जिल्हाधिकारी, पुणे यांचेकडे मा. महाअभियोक्ता यांच्या सल्ल्याच्या अधीन राहून वर्ग करण्यास (Relinquish) नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे.”

ठराव क्र. ६५/४

“ठराव करण्यांत येतो की, महामंडळाच्या मालकीची उजनी, ता.माढा, जि.सोलापूर येथील गट क्र.३३, ३४ व ३५ मधील १.३८ हेक्टर जमीन नॅशनल थर्मल पॉवर कॉर्पोरेशन या संस्थेस त्यांचे मागणीप्रमाणे ३० वर्षांच्या मुदतीने महामंडळाच्या प्रचलित दराने भाडेपट्ट्याने देण्यास व दरवर्षी प्रथम वर्षाच्या भाड्याच्या १० टक्के भाडेवाढ करण्याच्या अटीवर भाडेपट्टा आकारण्यास मा. महाअभियोक्ता यांच्या सल्ल्याच्या अधीन राहून नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे.”

ठराव क्र. ६५/५

“ठराव करण्यात येतो की, धामणी प्रकल्पातील धरणाच्या बैठकीसाठी लागणाऱ्या मौजे राई, मानबेट व पडसाळी, ता.राधानगरी, जि.कोल्हापूर येथील जमिनीतील पाईप लाईनची नुकसान भरपाई रक्कम रु.१,५७,४९५/- (रुपये एक लक्ष सत्तावन्न हजार चारशे पंच्चाण्णव फक्त) (परिशिष्ट-१ प्रमाणे) व धरणाच्या जलमग्न क्षेत्रातील पडसाळीपैकी शेटेवाडी येथील गावठाणाव्यतिरिक्त सरकारी क्षेत्रावरील ५ व खाजगी क्षेत्रावरील २ अशा एकूण ७ घरांच्या (निवाड्यात समाविष्ट नसलेल्या) नुकसान भरपाईची रक्कम रु.२,९७,५६२ (रुपये दोन लक्ष सत्यान्नव हजार पाचशे बासष्ट फक्त) (परिशिष्ट-२ प्रमाणे) या प्रमाणे एकत्रित रक्कम रुपये ४,५५,०५७/- (रु.चार लक्ष पंचावन्न हजार सत्तावन्न फक्त) संबंधित बाधित शेतकऱ्यांना अदा करण्यासाठी नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे.”

**“मान्य”**

| | |
|---|---|
| सही/- | सही/- |
| (इंजि. प्रफुल्लचंद्र चं. झपके) | (मा. ना. श्री. रामराजे नाईक-निंबाळकर) |
| कार्यकारी संचालक | मा.मंत्री, जलसंपदा (कृ.खो.पा.म.) |
| म.कृ.खो.वि.म, पुणे | व अध्यक्ष, म.कृ.खो.वि.म. पुणे |

# महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे-११

## नियामक मंडळाची ६५ वी बैठक दिनांक ७ जुलै २०१०

ठराव क्र.६५/६

“ठराव करण्यात येतो की, 'महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी, कराड या संस्थेस आरफळ कॉलनी, करवडी, ता.कराड येथील इमारत भाडेतत्वावर देणे' या विषयाबाबत मा.महाअभियोक्ता (Advocate General) यांचे अभिप्राय घेऊन पुढील कार्यवाही करावी.”

---

ठराव क्र. ६५/७

“ठराव करण्यात येतो की,

(१) हडपसर येथील कालव्यासाठी संपादित केलेली स.नं.१५ व १६ मधील २७००० चौ.मी. जागा भविष्यात पाटबंधारे खात्यास लागणार नसल्याने सदरच्या जागेची प्रचलित शासकीय दराने येणारी किंमत महामंडळास मिळण्याच्या अटीवर ग्रामपंचायत मांजरी बु.।। यांना पाणीपुरवठा योजनेकरिता साठवण तलाव बांधणेसाठी जिल्हाधिकारी, पुणे यांचेकडे मा. महाअभियोक्ता यांच्या सल्ल्याच्या अधीन राहून वर्ग करण्यास (Relinquish) नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे.

(२) जिल्हाधिकारी, पुणे यांचेकडे सदरची जागा वर्ग करण्यापूर्वी साठवण तलाव बांधणेसाठी नक्की कमीत कमी किती जागेची आवश्यकता आहे याची पुनःश्च तपासणी करावी व तेवढीच वर्ग करावी”

---

ठराव क्र. ६५/८

“ठराव करण्यात येतो की, महामंडळास स्वतःचा कोणत्याही उत्पन्नाचा स्त्रोत नसल्यामुळे यापूर्वी सन १९९६ ते २००९ या कालावधीकरिता देय हमी शुल्क व दंडनीय व्याजाची रक्कम यांची अदायगी शासनाने सन २००८-०९ मध्ये अर्थसंकल्पीय तरतूद करुन पुस्तकी समायोजनाने केलेली आहे. त्या धर्तीवर तरी वित्तीय वर्ष २००९-१० मध्ये दि.३१.०३.२०१० पर्यंत देय असलेली हमी शुल्क रक्कम रु.२५.१४९५ कोटी व दंडनीय व्याज रु.१.२६०७ कोटी अशी एकूण देय रक्कम रू.२६.४१०२ कोटीची अदायगी तसेच वित्तीय वर्ष २०१०-११ मध्ये दि.३१.०३.२०११ रोजी देय असलेली हमी शुल्क रक्कम रु.२३.२१७९ कोटी व दंडनीय व्याज रु.८.०९३८ कोटी अशी एकूण देय रक्कम रू.३१.३११७ कोटीची अदायगी पुस्तकी समायोजनाद्वारे करण्याकरिता शासनास विनंती करण्याच्या प्रस्तावास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे.”

---

ठराव क्र. ६५/९

“ठराव करण्यात येतो की,

(१) चासकमान डाव्या कालव्याच्या कामात बांधकामाच्या ठिकाणी मोठया प्रमाणात असलेली गळती कमी करण्याच्या दृष्टीने अस्तरीकरणाचे काम हाती घेण्यात आलेले आहे. कालव्याच्या आतील गळतीच्या भागात व उंच भरावाच्या ठिकाणी निवडक भागात नियमित पध्दतीने करावयाच्या संधानक अस्तरीकरणाऐवजी जिओसिंथेटिक मेंबरेन पध्दतीने अस्तरीकरण केल्यास ते पाणी गळती रोखण्यासाठी अधिक परिणामकारक होणार असल्याने कालव्याच्या या भागातील जिओसिंथेटिक अस्तरीकरणाच्या कामासाठी रुपये १२५३.०१ लक्ष एवढया खर्चाच्या दायित्व निर्मितीस नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे.

**“मान्य”**

| | |
|---|---|
| सही/- | सही/- |
| (इंजि. प्रफुल्लचंद्र चं. झपके) | (मा. ना. श्री. रामराजे नाईक-निंबाळकर) |
| कार्यकारी संचालक | मा.मंत्री, जलसंपदा (कृ.खो.पा.म.) |
| म.कृ.खो.वि.म, पुणे | व अध्यक्ष, म.कृ.खो.वि.म. पुणे |

# महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे-११

## नियामक मंडळाची ६५ वी बैठक दिनांक ७ जुलै २०१०

(२) सदर कामाचा समावेश प्रकल्पाच्या सुधारित प्रशासकीय मान्यतेच्या प्रस्तावात करावा.

(३) निधी उपलब्धतेनुसार सदर काम टप्प्याटप्प्याने करण्यात यावे."

ठराव क्र. ६५/१०

"ठराव करण्यात येतो की, माळेगाव कॉलनी येथील संपादित गट क्र. ९२/१अ मधील ३०० चौ. मी. जागा भविष्यात पाटबंधारे खात्यास लागणार नसल्याने सदरच्या जागेची प्रचलित शासकीय दराने येणारी किंमत महामंडळास मिळण्याच्या अटीवर आरोग्य उपकेंद्र, माळेगाव यांना देण्यासाठी जिल्हाधिकारी, पुणे यांचेकडे मा. महाअभियोक्ता यांच्या सल्ल्याच्या अधीन राहून वर्ग करण्यास (Relinquish) नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे."

ठराव क्र ६५/११

''ठराव करण्यात येतो की, सन २००८-०९ या वर्षाचा महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळाच्या लेखापरिक्षणानंतर महालेखापाल, मुंबई यांनी निर्गमित केलेल्या अलग लेखापरिक्षण अहवाल (S.A.R.) अनुपालन मान्य करण्यात येऊन तो अनुपालनासह विधानमंडळासमोर सादर करण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे''.

मा. अध्यक्ष यांचे परवानगीने आयत्या वेळेचे विषय

ठराव क्र. ६५/१२

"ठराव करण्यात येतो की, महामंडळांकडून नियुक्त केलेल्या तांत्रिक सल्लागाराला प्रत्येक महामंडळांमार्फत देण्यात येणाऱ्या मानधनाबाबत सुसूत्रता आणण्यासाठी कार्यकारी संचालक, महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे, यांची समन्वय अधिकारी म्हणून शासनाने नियुक्ती केलेली आहे. जलसंपदा विभागाच्या सर्व महामंडळांतर्गत प्रकल्पांना केंद्रीय जल आयोग / पर्यावरण विभाग / नियोजन आयोग इ. कडून मान्यता घेणे व ए.आय.बी.पी. अंतर्गत प्रकल्पांना अर्थसहाय्य मिळविण्यासाठी कार्यकारी संचालक, महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे, यांनी इतर महामंडळांच्या कार्यकारी संचालक यांच्याशी विचार विनिमय करुन तांत्रिक सल्लागाराची व समन्वयकाची नियुक्ती करणे, त्यांचे मानधन निश्चित करणे इ. बाबींवर निर्णय घेण्याचे अधिकार मा.सचिव (ज.सं.) व मा. मंत्री, जलसंपदा (कृखोपाम) व अध्यक्ष, महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, यांच्या मान्यतेने कार्यकारी संचालक, महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे, यांना देण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे."

ठराव क्र. ६५/१३

"ठराव करण्यात येतो की, 'सह्याद्री सहकारी साखर कारखाना मर्यादित कराड या कारखान्यास रहिमतपूर येथील गट नं. २३२, ३३४, ३७१, ३७१/२ मधील जमीन वार्षिक खंडाने ऊस बियाणे प्लॉट तयार करणेस ५ वर्षाच्या मुदतीसाठी मा. महाअभियोक्ता यांचे अभिप्राय घेऊन देण्यात यावी."

"मान्य"

| | |
|---|---|
| सही/- | सही/- |
| (इंजि. प्रफुल्लचंद्र चं. झपके) | (मा. ना. श्री. रामराजे नाईक-निंबाळकर) |
| कार्यकारी संचालक | मा.मंत्री, जलसंपदा (कृ.खो.पा.म.) |
| म.कृ.खो.वि.म, पुणे | व अध्यक्ष, म.कृ.खो.वि.म. पुणे |

# महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे-११

## नियामक मंडळाची ६५ वी बैठक दिनांक ७ जुलै २०१०

ठराव क्र.६५/१४

"ठराव करण्यात येतो की, खडकवासला पाटबंधारे विभागाची दौंड, जि. पुणे येथील १.४८ हे. जमीन भविष्यात पाटबंधारे खात्यास लागणार नसल्याने व शासकीय कार्यालयासाठी आवश्यकता असल्यामुळे सदरच्या जागेची प्रचलित शासकीय दराने येणारी किंमत महामंडळास मिळण्याच्या शर्तीच्या अधीन राहून प्रशासकीय इमारत बांधणेसाठी जिल्हाधिकारी, पुणे यांचेकडे मा. महाअभियोक्ता यांच्या सल्ल्याच्या अधीन राहून वर्ग करण्यास (**Relinquish**) नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे. "

ठराव क्र.६५/१५

"ठराव करण्यात येतो की,

१. पुरंदर उपसा सिंचन योजने अंतर्गत बारामती तालुक्यातील ६००० हेक्टर क्षेत्रास सिंचनासाठी उचलण्यात येणारे मुळा मुठा नदीतील दूषित पाणी नाझरे जलाशयात न सोडता, सदर पाणी आर.डी.पी. १० ते तुकाई टेकडी पर्यंत १४०० मि.मी. व्यासाच्या पाईपलाईनव्दारे सोडणेच्या रु.२६ कोटीच्या अतिरिक्त दायित्वाच्या प्रस्तावास नियामक मंडळाची तत्वतः मान्यता देण्यात येत आहे.

२. पुरंदर उपसा सिंचन योजनेअंतर्गत बारामती तालुक्यातील ६००० हे. सिंचन क्षेत्रासाठी सिंचन वितरण प्रणाली पारंपारिक कालवा पद्धती ऐवजी बंद पाईप लाईनद्वारे करण्यासाठी रु. ४२ कोटी खर्च अपेक्षित आहे. निविदेतील देय तरतूद वजा करुन उर्वरित वाढीव आर्थिक दायित्वाच्या प्रस्तावास नियामक मंडळाची तत्वतः मान्यता देण्यात येत आहे.

वरील दोन्ही प्रस्तावांचा समावेश प्रकल्पाच्या सुधारित प्रशासकीय मान्यतेच्या प्रस्तावात करण्यात यावा व सुधारित प्रशासकीय मान्यता मिळाल्यानंतर ही कामे हाती घेण्यात यावीत."

"मान्य"

| | |
|---|---|
| सही/- | सही/- |
| (इंजि. प्रफुल्लचंद्र चं. झपके) | (मा. ना. श्री. रामराजे नाईक-निंबाळकर) |
| कार्यकारी संचालक | मा.मंत्री, जलसंपदा (कृ.खो.पा.म.) |
| म.कृ.खो.वि.म, पुणे | व अध्यक्ष, म.कृ.खो.वि.म. पुणे |